# भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
# राष्ट्रवादी काँग्रेस
# आर.पी.आय. आघाडी

# संयुक्त जाहीरनामा

## विधानसभा निवडणूक २००९



# प्रस्तावना

या राज्यातील "आम आदमी" म्हणजेच "सामान्य माणूस" हा या जाहीरनाम्याचा केंद्रबिंदू आहे. त्याच्या सर्वांगिण विकासासाठी व सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी लोकशाही आघाडी अखंडपणे कार्यरत रहाणार आहे.

आम आदमीच्या मूलभूत गरजा म्हणजेच "अन्न","वस्त्र", "निवारा" या जीवनावश्यक मूलभूत बाबी सामान्य माणसाला लोकशाही आघाडी सरकारकडून खात्रीने पुरविल्या जातील.

राज्यातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्य, सुरक्षितता, स्थैर्य आणि शिक्षणविषयक सर्वोतोपरी काळजी घेण्यास आमचे आघाडी शासन कटीबध्द राहील.

आपले दैनंदिन आयुष्य आणि मालमत्ता सुरक्षित असण्याची खात्री सामान्य माणसाला असावी यासाठी पोलीस दलाला अधिक परिणामकारक व व्यावसायिक बनविण्यात येईल. यामुळे जनतेच्या मनात सुरक्षिततेबद्दल विश्वास अधिक बळकट होईल.

रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सुविधांबाबत सखोल विचार करुन लोकशाही आघाडीतर्फे आखलेले धोरण अधिक गतिमानरितीने कार्यान्वित करण्यात येईल.

वरील सर्व गोष्टी करीत असतांना नागरी विभाग किंवा ग्रामीण विभाग असा भेदभाव न करता सर्वांनाच सारखा निकष लावण्यात येईल.

महाराष्ट्रातील दरडोई उत्पन्न रु.४७,०५१/- वरुन पुढील ५ वर्षात शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रात उत्पादन आणि रोजगार निर्मितीकरुन रु.१ लाखापर्यंत वाढविण्याचा आघाडीतील सर्व पक्षांनी निश्चय केला असून महाराष्ट्रातील ''आम आदमी'' लखपती झाला पाहिजे असे लोकशाही आघाडीचे धोरण आहे.

वरील प्रकारची आश्वासने पूर्ण करण्याकरिता प्रशासकीय यंत्रणेत आमूलाग्र बदल करुन आम आदमीपर्यंत विकासाचे फायदे पोचविण्याचे प्रयत्न आमचे शासन करील. प्रशासन संवेदनक्षम, लोकाभिमुख व तत्पर असण्यावर लोकशाही आघाडी प्रामुख्याने भर देईल. याकरिता निरनिराळया विभागांमध्ये असलेल्या कार्यपध्दती सोप्या आणि सुटसुटीत करणे व त्यातील क्लिष्टता काढून सत्तेचे विकेंद्रीकरण करणे यावर आघाडीचा भर राहील. प्रशासन कायमस्वरुपी पारदर्शक पध्दतीने काम करील.

महाराष्ट्र हे राज्य पुढील ५ वर्षात Global Maharashtra होईल असा महाराष्ट्राच्या या सुर्वणमहोत्सवी वर्षात लोकशाही आघाडीतील सर्व पक्ष निर्धार करीत आहे.

# लोकशाही आघाडी सरकारची यशस्वी कामगिरी

गेल्या १० वर्षांच्या कार्यकाळात लोकशाही आघाडी शासन महसूलात फार मोठी वाढ करण्यामध्ये यशस्वी झाले आहे. १० व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत महाराष्ट्र राज्यासाठी रुपये ५९,१२२ कोटींची तरतूद होती. तर ११ व्या पंचवार्षिक योजनेत वरील रकमेत ११५ टक्के म्हणजे १ लाख २७ हजार ५३८ कोटी एवढी भरघोस वाढ झाली. त्याचप्रमाणे सन २००८-२००९ चा वार्षिक आराखडा २५ हजार कोटींचा होता तर २००९-२०१० या आर्थिक वर्षात आराखडा ३७ हजार ९५१ कोटींचा असून, त्यात ५१ टक्के वाढ झालेली आहे. गेल्या १० वर्षांच्या लोकशाही आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये प्रशासकीय खर्चात फार मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे या यशस्वी कामगिरीमुळे लोकशाही आघाडी सरकारला अनेक जनकल्याणाच्या योजना घेता आल्या व त्यामुळे राज्याच्या गतीशील विकासाचा पाया रचता आला.

७० लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना कर्ज माफी, राज्याच्या मागास भागांच्या विकासासाठी विशेष पॅकेज, विभागीय असमतोल दूर करण्याचा प्रयत्न, अल्पसंख्यांकासाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्र अंदाजपत्रकीय तरतुदी, आर्थिकदृष्ट्या मागास वर्गासाठी घरांची योजना व नागरी भागात मूलभूत सुविधांची निर्मिती अशा काही लोकशाही आघाडी सरकारच्या महत्वाच्या व यशस्वी योजनांचा उल्लेख करता येईल. गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत पुनरुज्जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र राज्याने सातत्याने पहिला क्रमांक कायम ठेवलेला आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राला सर्वाधिक तरतूदी मंजूर करण्यात आलेल्या आहेत. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत अंदाजे १ लाख २८ हजार ८९० कोटी गुंतवणुकीच्या १४७ विशाल प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे. १४६ सेझ प्रकल्प मंजूर करण्यात आले असून त्यात १ लाख ८८ हजार ७८३ कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. गुंतवणुकीच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याची प्रथम पसंतीचे राज्य म्हणून ख्याती कायम आहे. महाराष्ट्राचे अव्वल स्थान कायम ठेवण्याचा लोकशाही आघाडी शासनाचा प्रयत्न राहील.

## लखपती

नुकत्याच केलेल्या आर्थिक सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र राज्याचे दरडोई वार्षिक उत्पन्न रु.४७०५१/- असल्याचे आढळून आले. कृषी, औद्योगिक व सेवा क्षेत्रांमध्ये प्रभावी उपाययोजना करुन रोजगारांमध्ये वाढ करण्याचे आम्ही ठरविले आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना आणि विविध सुविधांच्या निर्मितीच्या माध्यमातून ग्रामीण भागांमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल त्यामुळे राज्यातील आम आदमी म्हणजे सामान्य माणसाचे सरासरी वार्षिक उत्पन्न १लाखांपर्यंत गेलेले असेल थोडक्यात महाराष्ट्र राज्यामध्ये येत्या पाच वर्षात आपण अनेक लखपती निर्माण करु.

## महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था, जातीय सलोखा, अंतर्गत सुरक्षा व पोलीस.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मित्र पक्ष हे भारतातील लोकशाही पध्दतीचे प्रतीक आहेत. २००९ च्या लोकशाही निवडणुका सुरळीतपणे व शांततेने पार पडल्या व यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व मित्र पक्षांनी जनतेचा विश्वास संपादित केला आहे.

**कायदा व सुव्यवस्था** :- शतकानुशतके महाराष्ट्रभूमी संतांची व समाजसुधारकांची माहेरघर म्हणून ओळखली जाते. या महापुरुषांनी एकता, सहिष्णुता, बंधुभाव आणि शांतता हे दिलेले संदेश मराठी संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत. महाराष्ट्रातील काँग्रेस प्रणीत आघाडी सरकार मराठी संस्कृतीने जोपासलेल्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती पावले निश्चित उचलेल व राज्यात राहणाऱ्या सर्वांना आवश्यक ते सर्व प्रकारचे संरक्षण देईल. स्थानिक माणसाला प्राध्यानाने शिक्षण, रोजगार व व्यवसायात योग्य त्या संधी राज्य प्रशासन देईलच, पण त्या बरोबर आपल्या शुद्र राजकीय स्वार्थांसाठी राष्ट्रीय एकात्मता बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना कडक शासनही करील.

**जातीय सलोखा:-** भारतीय राष्ट्रीय काँग्रस प्रणीत लोकशाही आघाडीचा सर्वसमावेशक विकासावर विश्वास आहे. जात, धर्म व भाषा यावर आधारित राजकारण लोकशाही आघाडीने कधीही केले नाही. समाजात शांतता व सलोखा असेल तर प्रगती होते या तत्वावर आघाडीचा विश्वास आहे. जातीयवाद व सांप्रदायिकतेचा सामना करण्यासाठी लोकशाही आघाडी सरकार नेहमी प्रमाणे भविष्यात दमदार पाऊले उचलेल.

जातीयवादाचा मुकाबला करण्यासाठी विशेष कायदा केला जाईल व त्यात अनेक कडक तरतुदींचा समावेश केला जाईल.

**नक्षलवाद आणि दहशतवाद :-** नक्षलवाद आणि दहशतवाद ही देशापुढील आव्हाने असून महाराष्ट्रही त्यास अपवाद नाही. लोकशाही आघाडी सरकार या दोन्ही समाजविघातक प्रवृत्तींचा बिमोड करण्यासाठी ठोस उपाययोजना करेल. या करिता शासनाने Force 1 नावाचे दहशतवाद व नक्षलवादाशी सामना करु शकणारे प्रशिक्षित व अत्याधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असे पथक तयार केल्याचे जनतेस ज्ञान आहे.

**मुंबईतील क्रायसीस मॅनेजमेंट ग्रुप :-** मुंबई हे शहर देशाची आर्थिक राजधानी आहेच परंतु त्याचबरोबर देशातील मोठे विमानतळ असणारे आंतरराष्ट्रीय दळणवळणाचे प्रमुख स्थळही आहे. त्यामुळे हे शहर दहशतवाद्यांच्या संभाव्य हल्ल्याच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील बनले आहे. मुंबई शहराच्या सुरक्षिततेची पूर्ण हमी आमच्या लोकशाही आघाडीचे शासन देत आहे.

मुंबईतील पोलीस यंत्रणा मुंबई शहरावर मानवनिर्मित आपत्तींचा मुकाबला करतात तर मुंबई महानगरपालिका नैसर्गिक आपत्तींवर मात करण्याचे व्यवस्थापन करते. या दोघांच्या नेतृत्वाखाली क्रायसीस मॅनेजमेंट ग्रुप (CMG) ची स्थापना करण्यात येईल तसेच महानगरपालिका आयुक्तांच्या नेतृत्वाखाली इमर्जन्सी रिस्पॉन्स ग्रुपची (ERG) स्थापना करण्यात येईल. हे दोन्ही गट मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखालील क्रायसीस मॅनेजमेंट कमिटीला (CMG) जबाबदार राहतील. त्यामुळे मुंबई शहराच्या सुरक्षिततेची पूर्ण हमी आघाडी शासन देत आहे.

# अन्नसुरक्षा

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना महिन्याला २५ किलो धान्य रुपये ३/- प्रती किलो दराने देण्यात येईल.

१) दारिद्र्यरेषेखालील सर्व पात्र कुटुंबांना या योजनेसाठी शिधापत्रिका उपलब्ध करुन दिल्या जातील व अनधिकृत (बोगस) शिधापत्रिका रद्द करण्यात येतील.

२) वाटप करण्यात येणारे धान्य निकृष्ट दर्जाचे नसेल याची खात्री करण्यात येईल.

३) महागाई रोखण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील व जीवनावश्यक वस्तुंचे भाव स्थिर ठेवले जातील.

# निवारा (घर )

स्वतःचे राहण्याकरिता घर असणे हा आम आदमीचा हक्क आहे. हा हक्क आमच्या आघाडी पक्षांना मान्य असून आम आदमीला घर देण्यासाठी आघाडीतील पक्ष कटीबध्द आहेत. ही संकल्पना साकार करण्याकरिता १० लाख घरे बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम पुढील ५ वर्षात राबविण्यात येईल.

**नागरी विभाग :**

आर्थिक दृष्टया दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी परवडण्याजोग्या किंमतीची घरे पुढील ५ वर्षात उपलब्ध करुन देण्याचा निर्धार आमच्या लोकशाही आघाडी सरकारचा आहे.

**ग्रामिण भाग :**

ग्रामिण भागातील प्रत्येक बेघराला घर देण्याकरिता व ज्याचे घर कच्चे आहे ते पक्के बनवून देण्याकरिता लोकशाही आघाडी शासन उपाययोजना करील. त्याचप्रमाणे प्रत्येक घरांमध्ये स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधण्यावर भर राहील.

राज्याच्या नागरी व ग्रामीण भागामध्ये प्रामुख्याने खालील योजना राबविण्यात येतील.

**१. जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकासः**

जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाकरिता प्रोत्साहन योजना राबविण्यात येईल. या योजनेद्वारे प्रत्येक भाडेकरुला किमान ३०० चौ.फू. बांधलेले चटईक्षेत्रफळ विनामूल्य व मालकी हक्काने दिले जाईल. ही योजना राज्यातील सर्व शहरांकरिता लागू केली जाईल.

**२. सामुहिक पुनर्विकास योजनाः**

सामुहिक पुनर्विकास योजनेमध्ये मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाबरोबर पायाभूत सुविधांचे योग्य नियोजन व उच्च दर्जा देण्याकरिता सामुहिक पुर्नविकास योजनापध्दतीचा विकल्प दिला जाईल. सामुहिक पुनर्विकास योजनेअंतर्गत जितके मोठे क्षेत्र असेल, तितके जास्त प्रोत्साहन दिले जाईल.

**३. म्हाडाच्या जुन्या वसाहतींचा पुनर्विकासः**

म्हाडाच्या जुन्या वसाहतींचा पुनर्विकास करण्याची योजना तेथील रहिवाशांना करुन दिली जाईल. ही योजना राबविण्याकरिता म्हाडा वसाहतीला २.५ चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करुन दिला जाईल. जेणेकरुन सद्या राहत असलेल्या कुटुंबांना अधिक मोठे घर देता येईल व नवीन घरांचीसुध्दा निर्मिती करता येईल. लोकांना ही योजना राबविण्यासाठी म्हाडाची भूमिका सहाय्यकारी राहील.

**४. धारावी पुनर्विकास योजना:**

धारावी पुनर्विकास योजनेच्या माध्यमातून जागतिक स्तराचे सुंदर शहर निर्माण केले जाईल. धारावीमध्ये सद्या राहत असलेल्या पात्र कुटुंबांचे धारावीमध्ये पुनर्वसन केले जाईल. पुनर्विकास करित असतांना सद्या उपलब्ध असलेल्या रोजगारांची साधने शक्यतो अबाधित ठेवण्याची काळजी घेण्यात येईल.

**५. बि.डी.डी.चाळींचा पुनर्विकास:**

मुंबई शहरातील बि.डी.डी.चाळी सुमारे ९० वर्षांपूर्वी बांधलेल्या असून चाळीतील खोल्या १६० चौ.फू. क्षेत्रफळाच्या आहेत. या वसाहतींचे पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेच्या माध्यमातून तेथील रहिवाशांना चांगल्या प्रकारची मोठी घरे व मोठ्या प्रमाणावर नवीन घरांची निर्मिती करण्यात येईल. ही योजना म्हाडामार्फत राबविण्यात येईल.

**६. गिरणी कामगारांसाठी घरकुल योजना:**

राज्यातील बंद पडलेल्या सूतगिरण्यांच्या कामगारांसाठी परवडणा-या किमतीत घरकुल उपलब्ध करुन देण्याची योजना म्हाडा मार्फत राबविण्यात येईल.

**७. पोलीस घरकुल योजना:**

पोलीस दलातील शिपाई व अधिकारी यांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण कार्यक्रम राबविण्यात येईल. ही योजना महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्या मार्फत राबविण्यात येईल.

**८. भाडेतत्वावरील घरकुल योजना:**

भाडेतत्वावरील घरकुल योजना राबविण्यासाठी शासकीय यंत्रणा किंवा खाजगी विकासक यांना प्रोत्साहन दिले जाईल. एमएमआरडीए मार्फत पाच लाख भाडेतत्वावरील सदनिका बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

**९. पत्रकारांसाठी घरकुल योजना:**

प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयी पत्रकारांकरिता घरकुल योजना म्हाडामार्फत राबविण्यात येईल. पत्रकारांना या योजनेअंतर्गत परवडणारी सदननिका उपलब्ध करुन दिली जाईल.

**झोपडपट्टीचे निर्मूलन :**

मुंबईत ५८ लाख लोक व महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये ७५ लाख लोक झोपडपट्टीत राहतात. या सर्वांना पुढील काळामध्ये कमीत कमी २६९ चौ. फुटाची स्वच्छतागृहांसहीत मालकी हक्काची घरे बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम आखण्यात येईल. या करिता मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड व नागपूर शहरांत पुढील प्रमाणे प्रभावी उपाययोजना आखल्या जातील. झोपडपट्टीची पात्रता तारीख दि.०१/०१/१९९५ पासून वाढवून दि.०१/०१/२००० पर्यंत करण्याचा निर्णय यापूर्वीच घेतलेला आहे.

झोपडपट्टी मुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या दिशेने झोपडपट्टी निर्मूलनासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील.

# कृषी

राज्यातील ६०% लोकसंख्या शेतीवर अवलंबून असल्याने शेतक-यांना केंद्रबिंदुमानून पुढील काळात त्यांचे उत्पादन वाढवून त्यास आर्थिकदृष्ट्या मजबूत करण्यात येईल.

आत्महत्या रोखण्याकरिता ज्या विशेष उपाययोजना आखलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी कडकरित्या करण्यात येईल. आत्महत्याग्रस्त भागातील शेतक-यांच्या सर्वंकष उन्नती व विकासाच्या योजना कालबध्द रितीने व प्रभाविपणे राबविण्यात येतील. जिराईत शेतक-यांची उत्पादनाची साधने वाढविण्यावर भर देण्यात येईल. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना दूध उत्पादन, कुक्कुटपालन, मेंढीपालन, रेशीमउद्योग, हातमाग, घरगुती उद्योग इत्यादींसारखे शेती संलग्न व्यवसाय करण्यासाठी आवश्यक त्या योजना गतिमान करण्यात येतील. शेतीमाल विकण्याकरिता शेतक-यांना योग्य बाजारपेठ थेट उपलब्ध होत नाही आणि त्यामुळे मधल्या दलालांची मदत घ्यावी लागते. यामुळे शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही व त्यांन बाजारापर्यंत जावे लागते.

★ राज्यातील कापूस उत्पादक परिसरात (भागात) कापसावरील प्रक्रिया करणारी केंद्रे उभी करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पाऊले उचलण्यात येतील.

★ शेतकऱ्यांनी बाजारपेठेपर्यंत जाण्याऐवजी बाजारपेठच शेतकऱ्यापर्यंत कशी येईल यासाठी आमचे आघाडी शासन योग्य ती उपाययोजना करील.

★ उत्पादनाच्या उत्पन्नाची (किंमतीची) किमान हमी देणारी सर्व समावेशक व सर्वंकश पीक विमा योजना तयार करुन ती राबविण्याचा प्रयत्न केला जाईल.

★ शेतीमालावर प्रक्रिया करणा-या छोट्या व मध्यम उद्योगांची ग्रामीण भागात उभारणी करण्यात येईल.

★ ''पाणी सर्वांचे- सर्वांसाठी'' हे धोरण राबविले जाईल.

★ राज्यातील जास्तीत जास्त कृषीक्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी अवर्षणप्रवण क्षेत्रात ठिबक, तूषार इत्यादी योजनांसाठी केंद्र शासनाच्या ५० टक्के अनुदानासोबत राज्य शासनातर्फेही शेतकऱ्यांना सवलत देण्याचा प्रयत्न केला जाईल.

## शेतमालाचे उत्पादन वाढविण्याकरिता खालील उपाययोजना करण्यात येतील.

१) अ) रोजगार हमी किंवा जवाहर विहीर योजना अंतर्गत बांधून झालेल्या सर्व विहीरींसाठी वीज पम्प कमी दरात उपलब्ध करुन देण्यात येतील.

ब) सिंचनासाठी कालबध्द कार्यक्रम आखून सर्व धरणे कालव्यासह पूर्ण करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात येईल.

२) शेतीकरिता मिळणाऱ्या कर्जावरील व्याजदर ३% करण्यात येईल. या व्यतिरिक्त चांगल्या प्रतीची औषधे, खते व बी - बियाणे शेतकऱ्यांना किफायतशीर दराने उपलब्ध करुन देऊन उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल.

**महाराष्ट्रातील फळझाडांची लागवड**

अ) या राज्यात प्रामुख्याने खालील फळांकरिता निर्यात क्षेत्र तयार करुन मालाच्या निर्यातीसाठी अनुदान व आवश्यक मूलभूत सुविधा शासनातर्फे पुरविण्यात येतील. उदा. १) डाळिंब २) केळी ३) संत्री ४) द्राक्षे ५) आंबा ६) मोसंबी इत्यादि.

ब) कृषी विभागामार्फत फुलांच्या निर्यातीकरिता आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करण्यात येतील.

 कृषी उत्पादनांवर मूल्यवर्धित प्रक्रिया करण्यात येईल आणि अशा मूल्यवर्धित उत्पादनांच्या निर्यातीसाठी "निर्यात झोन" निर्माण करण्यात येईल. यासाठी रुपये ५००० कोटींच्या गुंतवणुकीचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

# कामगार विभाग

राज्यात सुमारे ४.१२ कोटी कामगारांची संख्या असून यापैकी ९०% कामगार असंघटीत क्षेत्रात काम करतात तर कारखाना अधिनियमाखाली ३८००० कारखाने नोंदणीकृत असून त्यामध्ये सुमारे १७.२६ लाख कामगार काम करतात. दुकाने व संस्था अधिनियमाखाली १९.९३ लाख आस्थापना नोंदणीकृत असून त्यामध्ये सुमारे २७.४१ लाख कामगार काम करतात.

सध्याच्या काळात मालक वर्गाने त्यांचे उत्पादनावर लक्ष देऊन जागतिक मंदीचा सामना करणे आवश्यक आहे. यासाठी मालक वर्गास कामगार कायद्याचे पालन करण्यासाठी सुलभता निर्माण करणे, संघटीत तसेच असंघटीत क्षेत्रातील कामगारांना कामगार कायद्याचे फायदे मिळवून देणे व सध्याचा रोजगार टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

**स्मार्ट कार्ड:**

संघटीत व असंघटीत क्षेत्रातील सर्व कामगारांना कामगार कायद्याचे सर्व फायदे मिळवून देण्यासाठी प्रत्येकास "स्मार्ट कार्ड" देऊन विशेष ओळख क्रमांक (युनिक आयडेंटीफिकेशन नंबर) देण्यात येईल. हे स्मार्ट कार्ड कामगारांना सर्व ठिकाणच्या रोजगारासाठी वापरता येईल.

**कामगार कायद्याची सुलभपणे अंमलबजावणी होणे :**

१) राज्यात एकूण असंघटीत कामगारांचे ६७ गट आहेत. यापैकी अनेक गटांची किमान वेतन प्रकरणे ३वर्षांपेक्षा अधिक कालावधीकरिता प्रलंबित आहेत. म्हणून पुढील वर्षभराच्या काळात असंघटीत कामगारांच्या सर्व गटांचे किमान वेतन अद्यावत करण्यात येईल.

२) कारखाने, दुकाने व आस्थापना यांच्या विविध परवान्यांचा कालावधी ३वर्षांपेक्षा कमी असल्यास तो वाढवून ३ वर्षे करण्यात येईल.

३) शेतमजुरांमध्ये विविध प्रकारची व्यवसायिक कौशल्ये निर्माण करुन त्यांचे बचत गट स्थापन करुन त्यांना व्यवसायासाठी ४ टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

४) विविध प्रकारच्या कारागिरांचे बचत गट स्थापन करुन त्यांना उद्योगासाठी ४ टक्के व्याजाने बँकेचे कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

# ऊर्जा - भारनियमन मुक्त महाराष्ट्र

१. मागणी आणि उपलब्धतेत फार मोठी तफावत असून सध्या अत्युच्च मागणीच्या काळात ४५०० मेगावॅटचा तुटवडा आहे.

२. भारनियमनाबरोबरच पुष्कळदा अपु-या सोयी सुविधा व जुन्या साधन सामुग्रीमुळे वीज पुरवठ्यामध्ये व्यत्यय येतो.

३. विज निर्मितीचे नवनवीन प्रकल्प सुरु केल्याने २०१२ पर्यंत मागणी आणि पुरवठा यातील तफावत नाहीशी होणार आहे. फीडर सेपरेशन कार्यक्रम पूर्ण होत असल्यामुळे सध्याच्या वीज उपलब्धतेतून शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना जास्तीत जास्त काळ वीज पुरवठा होऊ शकेल. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना विनाव्यत्यय वीजपुरवठा करणे तसेच कृषी पंपांना ८ ते १२ तासांपर्यंत वीजपुरवठा वाढविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यात येईल. थोडक्यात २०१२ पर्यंत महाराष्ट्र भारनियमन मुक्त करण्यात येईल.

४. एम्. एस्. ई. डी. सी. एल्. द्वारा पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम व महाट्रान्सको मार्फत मोठे कार्यक्रम हाती घेण्यात येतील. या कार्यक्रमांमुळे जुन्या, कालबाह्य, अकार्यक्षम आणि जादा ताण येणा-या पायाभूत सुविधांचे प्रश्न सुटतील.

५. ग्राहकांचे जास्तीत जास्त समाधान होणे तसेच वीजेचा तोटा कमी करणे यासाठी निवडक ठिकाणी वीज वितरण फ्रेन्चाईझीजना (खाजगी संस्था) सोपविण्यात येईल.अपारंपारिक वीज स्त्रोतांपासून राज्यातील उत्पादन क्षमता पुढील ५ वर्षात दुप्पट करण्यात येईल.

६. सहवीजनिर्मितीला मदत करणे, प्रोत्साहन देणे तसेच वीज वाचवणा-या साधने आणि उपकरणांच्या वापरास उत्तेजन देण्यात येईल.

## पाणीपुरवठा व स्वच्छता

सन २०००पासून ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांचे नियोजन 'ग्रामपंचायतींच्या समित्यांमार्फत' होत आहे. ऑक्टोबर २००० पासून ग्रामिण भागांमध्ये व सन २००२ पासून शहरी भागांमध्ये 'संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान' राबविण्यात येत आहे.

सन २००८-०९ पर्यंत राज्यातील सर्व खेडोपाडी दरडोई ४० लिटरप्रमाणे पाण्याच्या उपलब्धतेचे उद्दिष्ट साध्य केले आहे. तसेच ६५ टक्के कुटुंबांकडे स्वतःची स्वच्छतागृहे आहेत. केंद्र शासनाच्या 'भारत निर्माण' योजनेअंतर्गत व राज्य शासनाच्या निरनिराळया योजना यांचा समन्वय साधून पुढील ३ वर्षात खालील उद्दिष्टें गाठण्यात येतील.

**१. ग्रामीण भाग** : राज्यातील १.१ कोटी ग्रामीण कुटुंबांपैकी १० टक्के लोकांजवळ स्वतःच्या घरगुती नळ जोडण्या आहेत. उरलेल्या सर्व कुटुंबांना पुढील ३ वर्षात घरगुती नळजोडण्या देण्यात येतील.

२. व्यक्तिगत स्वच्छतागृहे बांधण्याकडे लक्ष देऊन घर तेथे स्वच्छतागृह असे उद्दिष्ट गाठण्यात येईल.

**नागरी क्षेत्र :** राज्यातील ४० टक्क्याहून जास्त लोक नागरी क्षेत्रात राहत असून त्यापैकी फक्त ६० टक्के लोकांना स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध होते. या अभियानांतर्गत पुढील ३ ते ५ वर्षात सर्वांना स्वच्छतागृहे व झोपडपट्टीसह नागरी भागात पिण्याच्या पाण्याच्या नळ जोडण्या देण्यात येतील.

## रस्ते विकास

१) मुंबई-पुणे एक्सप्रेसवे धर्तीवर मुंबई-नाशिक एक्सप्रेसवे पुढील पाच वर्षात पूर्ण करण्यात येईल.

२) सध्याच्या मुंबई-पुणे एक्सप्रेसवे सायन पर्यंत विस्तारित करण्यात येईल.

३) राज्यातील निरनिराळया जिल्ह्यांना जोडणारे राज्यमार्ग चौपदरी करण्यात येतील. हे करीत असतांना संबंधित कंत्राटदाराला विशिष्ट कालावधीसाठी तो रस्ता देखभाल करण्याची जबाबदारी देण्यात येईल.

४) पंतप्रधान ग्रामीण रस्ते योजनेअंतर्गत व राज्य शासनाच्या अर्थसंकल्पातून या राज्यातील वाड्या, तांडे, पाडे, बेडे यासह ५०० लोकवस्ती पर्यंतच्या व त्यावरील सर्व गावांना डांबरी रस्त्याने जोडण्यात येईल.

५) रस्त्यांची अपूर्ण कामे ठराविक कालमर्यादेत पूर्ण करण्यात येतील.

# महसूल विभाग

**शेतजमिनीत महिलांचा हिस्सा**

स्त्रियांनी मागणी केल्यास त्यांचे नाव जमिनीच्या ७/१२ उता-यावर नोंदवण्याची तरतूद करण्यात येईल. संबंधित मालकाने जर यासंबधी हरकत घेतली तर तहसीलदार किंवा तत्सम अधिकाऱ्यांनी संबंधित मालकांची समजूत घालून ही योजना यशस्वी करण्यासाठी अधिक प्रयत्न करण्यात येतील.

**ग्रामीण भागात अकृषिक परवाने**

सध्याच्या धोरणाप्रमाणे, ग्रामीण भागात निवासी वापरासाठी अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही. या योजनेची व्याप्ती वाढवून ग्रामीण भागात कोणत्याही अकृषिक वापराकरिता परवानगीची आवश्यकता नाही असे धोरण राबविण्यात येईल. उदारणार्थ आटाचवकी, छोटी दुकाने, चहाची हॉटेल्स इत्यादि.मात्र बांधकाम परवाना आवश्यक राहील.

**बिनशेती वापराकरिता जमीन घेण्याबाबतच्या धोरणाची वैशिष्ट्ये :**

१) सिंचन साधने उपलब्ध असलेल्या किंवा पुढे उपलब्ध होऊ शकणाऱ्या जमिनी कोणत्याही परिस्थितीत संपादित करण्यात येणार नाहीत.

२) मँग्रोज (Mangroves) असलेल्या जमिनी संपूर्णपणे वगळण्यात येतील.

३) शक्यतो भूसंपादन कायद्याअंतर्गत जमीन न घेता विकासक व जमीन मालक या दोघांनी आपसात विचार करुन जमिनीची देवाणघेवाण करण्याला प्रोत्साहन देण्यात येईल.

४) हे करीत असतांना आधी पुनर्वसन व मग योजना हे तत्व अंगीकारण्यात येईल.

**भूमी अभिलेख संगणकीकरण**

भूमी अभिलेख संगणकीकरणाचे काम केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत सुरु असून, या योजनेमुळे पुढील फायदे होणार आहेत :

१) जनतेस संगणकीकृत ७/१२ उतारा, मिळकत पत्रकाबरोबर आवश्यक असल्यास नकाशा वितरित करण्यात येईल.

२) नकाशांचे डिजिटायझेशन करण्यात येईल.

३) दुय्यम निबंधक कार्यालय व तहसिलदार कार्यालय संगणकामार्फत जोडण्यात येतील व त्यामुळे तलाठी दप्तरी फेरबदलाची नोंद तात्काळ होण्याची तजवीज करण्यात येईल.

**जिल्हा व तालुक्यांचे विभाजन**

सध्या प्रलंबित असलेले जिल्हे व तालुका विभाजनाच्या सर्व प्रस्तावांवर सखोल विचार करुन पुढील दोन वर्षात निर्णय घेण्यात येईल.

★ ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी प्रत्येकी ५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

# नगर विकास विभाग

-  महाराष्ट्र हे देशातील सर्वात जास्त नागरीकरण झालेले राज्य आहे. JNNURM व UIDSSMT ययोजनेअंतर्गत प्रामुख्याने वाहतूक व्यवस्था व रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या योजना, मलनि:सारण व घनकचरा व्यवस्थापन या कामांकरिता निधी उपलब्ध होतो. या निधीचा राज्यातील सर्व महानगरपालिकांकडून पुढाकार घेऊन या दोन्ही योजनांतर्गत नागरीकरणाला आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आग्रह करण्यात येईल.
-  समायोजन आरक्षणाची (Accommodation Reservation ) व्याप्ती सर्व महानगरपालिकांसाठी वाढविण्यात येईल.
-  राज्यात 'ड' वर्ग महानगरपालिका, नगरपालिका व नगरपालिका व नगरपंचायती यातील मुलभूत सुविधा फार प्राथमिक अवस्थेत आहेत. त्यामुळे या सर्व नागरी भागाकरिता एक महत्वाकांक्षी कार्यक्रम आखून अनुदान व कर्जे रुपाने या सगळ्या प्रकल्पांना सहाय्य केले जाईल.
-  जकात हा विषय राज्यात अनेक वेळा चर्चिला गेला आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर बघितल्यास बव्हंशी नागरी क्षेत्रात जकात या प्रकारचा कर नसतो. लोकशाही आघाडी सरकार पुढाकार घेऊन 'ड' वर्ग महानगरपालिकांची जकात रद्द करेल.
-  नागरी सेवांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर या सेवा देण्याचा विचार लोकशाही आघाडी सरकार करेल.
-  शहरांमध्ये गरजेनुसार दफनभूमी व स्मशानभूमींची संख्या वाढविण्यात येईल.

# व्हिजन मुंबई

मुंबई शहर ही देशाची आर्थिक राजधानीच नव्हे तर भारताच्या नव्या आत्मविश्वासाचे, सामर्थ्याचे व प्रगतीचे केंद्र आहे. या नगरीने प्रत्येकास भरभरुन दिले असून मात्र आपण या नगरीचे ऋण फेडण्यात कमी पडलो असल्याची वस्तुस्थिती आहे. म्हणूनच लोकशाही आघाडी सरकारने प्रथमच मुंबई विकासाची एक महत्वाकांक्षी योजना आखली व त्यावर अंमलबजावणीही सुरु केली आहे. सदर योजना ''व्हिजन मुंबई" म्हणून ओळखली जाते.

मुंबई शहराला जागतिक दर्जाचे शहर बनविणे म्हणजेच मुंबईतील प्रत्येक नागरिकाचे राहणीमान सुधारणे, त्यांना स्वच्छ व शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणे, प्रदूषण कमी करणे, वाहतुकीची कोंडी कमी करुन नागरिकांचा प्रवास सुसह्य व सुकर करणे, नोकरीच्या संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देणे, झोपडपट्टीवासीयांना राहण्यासाठी चांगली घरे व त्यांच्या कुटुंबियांच्या प्रगतीसाठी पोषक वातावरण उपलब्ध करुन देणे, शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतीत राहणा-यांना भयमुक्त करणे व शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र सुधारणा घडवून आणणे हे होय. म्हणूनच ''व्हिजन मुंबई" योजनेत या सर्व गोष्टीचा समावेश आहे.

वरील बाबींची पूर्तता करण्यासाठी लोकशाही आघाडी पक्षामार्फत खालील कामे हाती घेण्यात येतील.

**१. पायाभूत सुविधांत आमूलाग्र सुधारणा :**

(अ) **रेल्वे उपनगरीय सेवांमध्ये सुधारणा** –ज्या लोकलची क्षमता प्रत्येकी सुमारे १७०० प्रवासी वाहून नेण्याची आहे, त्यात सुमारे ५००० नागरिक असह्यपणे प्रवास करतात. ही असुविधा टाळण्यासाठी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचा पहिला टप्पा सुरू केला असून तो पूर्णत्वास येत आहे. त्यामुळे उपनगरीय रेल्वेतील गर्दी सुमारे ३५०० पर्यंत खाली येणार आहे. नवीन लोकलमध्ये शुध्द हवा खेळती राहण्यासाठी बसवण्यात आलेल्या यंत्रणेमुळे नागरिकांना प्रसन्न चित्ताने प्रवास करता येणार आहे. लोकलमधील गर्दी सुमारे १७०० प्रती लोकल एवढी खाली आणण्यासाठी त्वरित एम्. यू. टी. पी. टप्पा दोनची कामे हाती

घेण्यात येतील. त्याचप्रमाणे१०० नवीन रेल्वे गाड्या उपलब्ध करुन देण्यात येतील. सुमारे १२०० अद्ययावत डब्यांची भर पडून, लोकलमधील गर्दी कमी होईल. वाढीव डब्यांमुळे बोरीवली ते विरार तसेच ठाणे ते कल्याण या मार्गावरही अधिक सेवा उपलब्ध करणे शक्य होईल.

वर्षानुवर्षे गुंतवणूक न केल्याने रेल्वे सेवा सुधारण्याकरिता अधिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे. यासाठी विरारपुढे डहाणूपर्यंत रेल्वे सेवा एम्. यू. टी. पी. टप्पा-३ खाली उपलब्ध करुन देण्याचे काम हाती घेण्यात येईल. तसेच या टप्प्या अंतर्गत वसई ते पनवेल हा नागरी प्रवाशांसाठी नवीन रेल्वे मार्ग बांधण्यात येईल. त्याचबरोबर मुंबई ते नवी मुंबई या मार्गावर जलद लोकल सेवा सुरु करण्यात येईल.

(आ) **मुंबई मेट्रोची उभारणी :** महानगरी म्हटल्यानंतर त्या ठिकाणी मेट्रो रेल अत्यावश्यक आहे. उशिरा का होईना हे काम आपण हाती घेतले आहे. सुमारे २०११ पर्यंत वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा पहिला टप्पा पूर्ण होईल. चारकोप-मानखुर्द हा टप्पाही पुढील ५ वर्षात पूर्ण करण्यात येईल. त्याचप्रमाणे कुलाबा ते बांद्रा या तिस-या टप्प्याचे कामही सुरु करुन पुढील ५ वर्षात ते पूर्णत्वास नेले जाईल.

(इ) **बांद्रा-वरळी सेतू :** या सेतूच्या माध्यमातून मुंबईस एक जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा उपलब्ध झाली आहे. वरळी ते हाजी अली या टप्प्याचे काम पुढील अडीच वर्षात तर हाजी अली ते मरिन ड्राईव्ह या टप्प्याचे काम पुढील ३ वर्षात पूर्ण करण्यात येईल. यामुळे मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी जवळजवळ नाहीशी होईल.

(ई) **शिवडी-न्हावा प्रकल्पाचे काम पूर्ण करणे :** या सुमारे २६ कि.मी. लांबीच्या सागरी सेतुचे बांधकाम खाजगी उद्योजकांच्या सहभागाने पुढील ५ वर्षात पूर्ण करण्यात येईल.

(उ) **मुंबई प्रदेशात अद्यावत रस्त्यांचे जाळे उभारणे :** राज्य शासनाने एका अभ्यासगटामार्फत मुंबई प्रदेशाचे सर्वेक्षण करुन या भागात कोणकोणते रस्ते करणे आवश्यक आहे याचा आराखडा तयार केला आहे. या अभ्यासावर आधारित मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पुढील ५ वर्षात सुमारे २०० कि. मी. लांबीचे सहापदरी रस्ते बांधण्यात येतील.

(ऊ) **मुंबई महानगर प्रदेशात नवीन रोजगाराची साधने उपलब्ध करणे:** बांद्रा-कुर्लाच्या धर्तीवर मुंबई महानगर प्रदेशाची नवीन ५ विकास केंद्रे उभारण्यात येतील.

(ए) **विमानतळाचा विकास :** मुंबई विमानतळाची वाढती हवाई वाहतूक हाताळण्याची गरज लक्षात घेता सिडकोमार्फत नवी मुंबई येथे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात येईल. मानखुर्द ते नवी मुंबई विमानतळ असा नवीन मेट्रो रेल मार्ग उभारुन मुंबई व नवी मुंबई विमानतळ दरम्यान वाहतूक सुरु करण्यात येईल. मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली आहे. हे काम पूर्णत्वास नेण्याचा लोकशाही आघाडी सरकारचा संकल्प आहे.

(ऐ) **मोनोरेलची उभारणी :** काँग्रेस पक्षाच्या पुढाकाराने मुंबईत मोनोरेल प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. यामध्ये खाजगी गुंतवणुकीच्या माध्यमातून आणखी सुमारे ३० कि. मी. लांबीच्या मोनोरेलची उभारणी करण्यात येईल.

(क) **छत्रपती शिवाजी टर्मिनसचे आधुनिकीकरण :** केंद्र शासनाकडे आग्रह धरुन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा कायापालट करण्यात येईल.

(ख) **मिठी नदीच्या प्रदेशाचा विकास :** पुढील ५ वर्षात मिठी नदी स्वच्छ तर केली जाईलच परंतु या परिसराचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यात येईल.

(ग) **स्वच्छतागृहांची उभारणी :** मुंबईत मोठ्या अंतरावरुन प्रवास करुन नागरिक येतात. त्यांच्या सुविधेसाठी अद्यावत स्वच्छतागृहे बांधण्यात येतील.

(घ) **खड्डे विरहित रस्ते :** रस्त्यांवर पडणारे खड्डे हे मुंबई नागरिकांची कायमची डोकेदुखी. यावर उपाय म्हणून मुंबईतील महत्वपूर्ण रस्ते खाजगी व नामांकित कंपन्यांकडे दीर्घ मुदतीकरिता देखभालव दुरुस्तीसाठी सुपूर्द करण्यात येतील.

## मुंबई - पर्यटन विकास

मुंबई हे केवळ देशाचे वित्तीय व आर्थिक केंद्र नसून, पर्यटनाच्या दृष्टीनेही एक महत्वाचे ठिकाण आहे. मुंबईस परदेशातून येणा-या प्रवाशांची संख्या सर्वाधिक आहे. या प्रवाशांनी मुंबईतील पर्यटन केंद्रांना भेट देण्यासाठी येथील सुविधांमध्ये आमूलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे. हे काम केवळ शासनावर सोपविणे पुरेसे नसून यासाठी खाजगी संस्था व शासन यांचा परस्पर सहभाग वृध्दींगत करणे गरजेचे आहे. लोकशाही आघाडी सरकार मुंबई हे एक आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून नावारुपास आणण्यासाठी खालील योजना हाती घेईल.

१. मुंबई महानगरपालिका व मुंबई फर्स्ट या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई टूरिझम प्रमोशन कंपनीची स्थापना करण्यात येवून, या कंपनीमार्फत मुंबईसाठी एक पर्यटन विकास योजना तयार करण्यात येईल. तसेच पर्यटन केंद्रांच्या विकासाकरिता विविध उपक्रम हाती घेण्यात येतील.

२. मुंबई व मुंबईच्या जवळपास अनेक जुन्या वास्तू राज्य पुरातत्व विभागाकडे दुरुस्ती देखभाली करता हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. सदर वास्तू वरील स्थापन केलेल्या कंपनीकडे दुरुस्ती करण्याकरिता देण्यात येतील.

३. मुंबई म्हणजे सिनेमासृष्टीचे माहेघर असून या सिनेमासृष्टीचे दर्शन भारताच्या इतर भागातून येणा-या पर्यटकांना घडविण्यासाठी सिनेसृष्टीतील मान्यवरांच्या मदतीने गोरेगाव येथे एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॉलिवूड म्यूझियम उभारण्यात येईल.

४. मुंबई एक आकर्षक खरेदी केंद्र म्हणून नावारुपास येण्यास लोकशाही आघाडी सरकार प्रयत्नशील राहील. यासाठी काही महत्वाची ठिकाणे वाहन विरहित खरेदी केंद्रे म्हणून निवडली जातील. परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी दुकानदारांशी चर्चा करुन खास योजना आखल्या जाईल.

५. नागरिकांना संगीतमय वातावरणात काही काळ घालविण्यासाठी बॅन्डस्टॅन्ड केंद्रांचे आकर्षण होते, परंतु कालांतराने ती दुर्लक्षित झाली. म्हणून मुंबईतील बॅन्डस्टॅन्ड केंद्रे पुन्हा कार्यरत करण्यात येतील.

६. एलिफंटा येथील गुहांना एक आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्यात येईल.

७. मुंबईमध्ये किमान ३ ठिकाणी रात्र बाजारांची (Night Bazaars) स्थापना करण्यात येईल.

८. मुंबईत अनेक भागात जुन्या व हेरिटेजच्या दृष्टीने मौल्यवान अशा वास्तू आहेत. त्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी आघाडी आघाडी शासन प्रयत्नशील राहील. यासाठी अशा वास्तूंना मालमत्ता करातून सूट दिली जावून सदर वास्तू मालकांना पर्यटकांच्या भेटीसाठी वास्तूत प्रवेशिका लावण्याची संधी दिली जाईल. या प्रवेशिकांवर कर आकारला जाणार नाही.

९. ऑपेरा हाऊस तसेच वॅटसन हॉटेल्स या वास्तू शासन संपादित करुन त्यांचे संवर्धन करील.

# पर्यावरण विभाग

**सुरक्षित पर्यावरण-सुंदर जीवन**

१. राज्यातील नद्या व नाले उद्योगांमुळे निर्माण होणा-या टाकावू वस्तुंमुळे तुंबलेले आहेत. गंगा-यमुना व मिठी नदीच्या स्वच्छता अभियानाप्रमाणे पुढील पाच वर्षात राज्यातील सर्व नदी व नाले प्रदूषण विरहित होण्याकरिता कार्यवाही करुन ते पूर्वीप्रमाणे वाहतील अशी योजना कार्यान्वित करण्यात येईल.

२. नागरी भागात वाहनांमुळे होणा-या वायू प्रदूषणावर उपाययोजना करण्यात येईल.

३. राज्यात झपाट्याने औद्योगिकरण होत असले तरी, पर्यावरणाच्या तत्वाच्या बाबतीत कोणतीही तडजोड शासन करणार नाही. याउलट पर्यावरणाची तत्वे कशाप्रकारे राबविता येतील याकडे शासन लक्ष देईल. असे करीत असतांना पर्यावरण हे प्रगतीच्या आड येऊ नये याकरिता असलेल्या कार्यप्रणालीत सुलभता आणण्याचा प्रयत्न आघाडी शासन करील.

## वातावरणीय बदल (Climate Change)

जागतिक तापमानवाढ (Global Warming ) वातावरणीय बदलांमुळे या राज्यातील जनतेला फार मोठे नुकसान होऊ शकते, याची पक्षाला जाणीव आहे. महाराष्ट्राच्या किनारपट्टीवरील लोकांना व मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय आर्थिक राजधानीला या बाबीचा संभाव्य धोका फार मोठा आहे.

हा धोका टाळण्याकरिता एक कृती योजना शासन तयार करील. असा धोका कोणत्या कारणांमुळे होऊ शकतो व ती कारणे संपूर्णपणे नष्ट कशी करावयाची याबद्दल कृती योजनेत उपाय योजना अंतर्भूत करुन लोकशाही आघाडी सरकार जाणीवपूर्वक त्यावर निर्णय घेईल.

# वन विभाग

राज्यात वनाखालील क्षेत्रे वाढविण्याचा लोकशाही आघाडी शासनाचा प्रयत्न राहील. नागरी विभागात वनीकरण करण्यासाठी एक महत्वाकांक्षी योजना शासन राबवित आहे. पुढील पाच वर्षात जास्तीत जास्त पडीक जमीन वनक्षेत्राखाली आणण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल.

वने बाधित न होता ''वन पर्यटन'' कसे वाढविता येईल याचाही विचार पक्ष करील. यामुळे सामान्य जनतेला वन्यसृष्टी व वन्यप्राणी यांच्याबद्दल प्रेम निर्माण होऊन त्याच्या संवर्धनाकरिता लोक उत्साहाने सहभागी होतील. पर्यटन वाढीकरीता खाजगी संस्थेचा सहभाग ''PPP'' या MODEL वर घेण्यात येईल.

# जलसंवर्धन

महाराष्ट्रातील ५२ टक्के जमीन ही दुष्काळग्रस्त पट्टयात येते. सुमारे ३९ टक्के जमीन ही हलक्या व अति हलक्या प्रतीची आहे. वाहते पाणी आणि विहिरीद्वारे होणारे जलसिंचन १६ टक्के सुपीक जमिनीला मिळते. संपूर्ण जलसिंचनाची क्षमता विकसित केली तरी ७० टक्के जमीन ही पावसावरच अवलंबून राहील. जलसंवर्धनाच्या अनेक उपायांबरोबर पाणलोट विकास हा महत्वाचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेण्याची गरज आहे. पुढील ५ वर्षात यासंदर्भात शासन धोरणात्मक निर्देश देऊन व आवश्यक प्रशासकीय रचना करुन या कार्यक्रमास भरघोस निधी पुरवेल.

जलसंवर्धन कामातील एक महत्वाची समस्या म्हणजे देखभाल आणि दुरुस्तीच्या व्यवस्थेचा अभाव. लोकशाही आघाडी

शासन देखभाल व दुरूस्ती यासाठी एक स्वतंत्र निधी उभारुन या निधीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी गावक-यांवर सोपवेल. त्याचबरोबर १४ लाख हेक्टर पडित जमीन येत्या ५ वर्षात पुनर्वापरात आणण्याचा मोठा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. अंमलबजावणीतील सर्व अडथळे दूर करण्यात येतील.

जलसंवर्धन आणि पाणलोट विकास कार्यक्रमांच्या जोडीने पुरेसा निधी, प्रशिक्षण तसेच तांत्रिक गोष्टींची पूर्तता करण्यात येईल. त्यामुळे कोरडवाहू जमीन अधिक उत्पादक होऊन वापरात आणणे शक्य होईल.

- राज्यात नदीजोड प्रकल्पाच्या अंमलबजावणीची शक्यता तपासण्यात येईल.

## रोजगार हमी योजना

फलोत्पादनाशी रोजगार हमी योजना निगडित केल्यानंतर फलोत्पादन क्षेत्रात जवळपास ५०० टक्के वाढ झाली आहे. उत्पन्न वाढविणे आणि रोजगार निर्मिती करण्याची मोठी क्षमता या कार्यक्रमात आहे. शासन यापुढे कोरडवाहू भागांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यास वेग देईल. त्याचप्रमाणे या कार्यक्रमांतर्गत पुढील ३ वर्षात फलोत्पादनामध्ये दुपटीने वाढ करण्याचे नियोजन केले जाईल.

येत्या ५ वर्षात जवाहर विहिरी कार्यक्रमांतर्गत कमीत कमी ३ लाख नवीन विहिरी बांधण्यात येतील व त्यावर पंप लावण्यात येतील बांधण्यात आलेल्या जवाहर विहिरींकरिता सुलभ रीतीने कर्ज मिळवून देऊन या विहिरींवर पंप लावण्यात येतील.

## स्वास्थ्य

''सर्वांना स्वास्थ्य " हे आमचे ध्येय आहे.

१) राज्यातील दारिद्रय रेषेखालील सर्वांना शासकीय रुग्णालयात विनामूल्य सेवा सध्या देण्यात येते. या योजनेची व्याप्ती वाढवून त्याच्यात गंभीर आजार व शस्त्रक्रिया टप्याटप्याने समावेश करण्यात येईल.

२) ज्यादा लोकांना फायदा होण्यासाठी जीवनदायी योजनेची व्याप्ती वाढविण्यात येईल.

३) दारिद्रय रेषेखालील लोकांकरिता दवाखान्यातील उपचारासाठी विमा योजना टप्प्या टप्प्याने लागू करण्याचा विचार करण्यात येईल

## प्रशासन

जनतेला राज्यकर्त्यांकडून सुशासनाची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. त्यासाठी जनता राजकीय पक्षांच्या हातात प्रशासनाची सूत्रे सोपवित असते. म्हणून सुशासन आणण्यासाठी पुढील गोष्टींची अंमलबजावणी केली जाईल.

जनतेची महत्वाची भूमिका ध्यानात घेऊन कारभार पारदर्शक करणे व जनतेला प्रशासनातील खरे भागधारक समजणे तसेच त्यांच्यामध्ये आत्मप्रतिष्ठा आणि आत्मसन्मान जागृत करणे, रुग्णालये, पोलीस ठाणे, सेवाक्षेत्र या सारख्या शासकीय विभागांमध्ये २४ तास हेल्पलाईन (मदत केंद्र) सुरु करण्यात येईल.

कोणत्याही नागरिकांनी विचारलेल्या प्रत्येक समस्या अथवा प्रश्नांविष्ययी सकारात्मकरित्या प्रतिसाद देणारे अधिकारी या हेल्पलाईनवर (मदत केंद्रांवर) उपलब्ध असतील.

तसेच संवेदनक्षम व लोकाभिमुख प्रशासनाची संकल्पना अधिक बळकट करण्यात येईल.

१. सर्व विभागांचे संगणकीकरण व सेतू योजनेच्या धर्तीवर योजना आखण्यात येतील.

२. जातीचे दाखले देण्याची कार्यपध्दती अधिक सुलभ करण्यात येईल.

३. माहिती अधिकाराच्या कायद्याची अंमलबजावणी कडकरित्या करण्यात येईल. सर्व प्रलंबित प्रकरणांचा निपटारा कालबध्दपणे विशिष्ट मर्यादेत करण्याकरिता आवश्यक कर्मचारी वर्ग निर्माण करण्यात येईल.

४. शासनाने काही वर्षांपूर्वी लोकशाही दिन व पालकसचिव या योजना जाहीर केल्या होत्या. पालकमंत्र्यांनी त्या त्या जिल्हयात निरनिराळया विकास कामांवर देखरेख करावयाची आहे. या योजनेच्या अनुभवावरुन पुढील काही गोष्टी नजरेस येतात. लोकशाही दिनाच्या दिवशी पुढीलप्रकारचे अर्जदारच जास्त प्रमाणात असतात.

(अ) नोकरी मागणारे

(ब) वैयक्तिक अडचणी घेऊन येणारे शासकीय, निमशासकीय संस्थांचे कर्मचारी.

वरील अनुभव लक्षात घेता, लोकशाही दिनी असे अर्ज न स्वीकारता याकरिता महिन्यातून एक स्वतंत्र लोकशाही दिन ठरविण्यात येईल. त्यादिवशी फक्त या प्रकारचे अर्ज स्वीकारण्यात येतील. त्यामुळे उर्वरित लोकशाही दिनाच्या दिवशी लोकांच्या वैयक्तिक अडचणी व विकासाच्या बाबतीत संबंधित अधिका-यांना लक्ष केंद्रित करता येईल.

दर महिन्याला एक दिवस संबंधित पालकमंत्री, पालकसचिव व जिल्हास्तरीय अधिकारी यांची बैठक घेऊन लोकशाही दिनी आलेल्या अर्जांचा आढावा घेऊन बहुतेक प्रकरणी जिल्हास्तरावरच निपटारा करण्यावर भर देण्यात येईल.

## उच्च शिक्षण विभाग

**सर्वांसाठी उच्च शिक्षण : यशाचा महामार्ग**

- समाजातील कमकुवत घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च तांत्रिक शिक्षणामध्ये समान संधी उपलब्ध करुन दिल्या जातील.

**पुढील घटकांना मोफत शिक्षण देण्यात येईल :-**

- दारिद्रयरेषेखालील विद्यार्थी, मागासवर्गीय विद्यार्थी, आणि शासनाच्या नियमानुसार कमकुवत अल्पसंख्यांक विद्यार्थी.
- राज्यातील दारिद्रयरेषेखालील व दुर्बल घटकातील (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,

  भटक्या जमाती, विमाप्र, इमाव, मुली, अल्पसंख्यांक व अंपग) सर्वच मुलामुलींना व्यावसायिक व अन्य सर्व शाखांच्या पदवीपर्यंतच्या उच्च शिक्षणाची सोय विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येईल.
- विविध राज्य व केंद्र शासनाच्या त्याचप्रमाणे बँका आणि तत्सम संस्थांमध्ये नोकरी मिळविण्यासाठी घेण्यात येणा-या स्पर्धा परिक्षांच्या पूर्वतयारीची योजना आखण्यात येईल व त्याद्वारे समाजातील सर्व थरातील परिक्षार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन केले जाईल.

### क्रीडा व युवककल्याण

- तरुण पिढीला स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा म्हणून त्यांना व्यावसायिक मार्गदर्शन, कर्ज व त्यांनी उत्पादीत केलेल्या मालाच्या विक्री व्यवस्थेची जबाबदारी शासन उचलेल व त्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात येतील.
- तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण घेणा-या बेरोजगार तरुणांसाठी स्वतंत्र औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात येतील.
- क्रीडा क्षेत्रामध्ये विशेष नैपुण्य दाखविणा-या विद्यार्थी व युवकांसाठी प्रोत्साहनपर योजना राबविण्यात येतील.

# शालेय शिक्षण विभाग

शिक्षण हे व्यक्तिमत्व विकासाचे व सर्व क्षेत्रातील प्रगतीचे प्रमुख साधन आहे. समाजविकासाचा दूरगामी दृष्टिकोन ठेवून १०० टक्के पटनोंदणी होणे, मुलांची उपस्थिती वाढणे व त्यांच्या गळती आणि नापासीचे प्रमाण कमी करण्यावर प्रस्तावित योजनांमध्ये प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मुली, अल्पसंख्यांक व अपंग या दुर्बल घटकांच्या शैक्षणिक विकासावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रासारख्या राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारसरणीची वैचारिक बैठक व परंपरा असलेल्या राज्यात दुर्बल घटकातील मुलामुलींना पदवी स्तरापर्यंतचे व्यावसायिक शिक्षण व अन्य सर्व शाखांचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय शासन घेईल. वरील सर्वबाबींची प्रचिती आपणांस खालील योजनांचे अवलोकन करतांना येईल.

१) मुलींना सर्व प्रकारचे पदवी पर्यंतचे शिक्षण व मुलांना १२ वी पर्यंतचे शिक्षण मोफत देण्यात येईल.

२) केवळ १ ते ४ ऐवजी वर्ग १ ते ८ मध्ये शिकणा-या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील विद्यार्थी व आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना मोफत गणवेष व लेखन साहित्य पुरविण्यात येईल.

३) ग्रामीण भागातील ८ ते १२ वी पर्यंतच्या सर्व मुलींना (अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मुलींसह) मोफत सायकलींचा पुरवठा करण्यात येईल.

४) राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पालकांच्या वर्ग ५ ते १२ मध्ये शिकणा-या मुलींसाठी वसतिगृहांची स्थापना करण्यात येईल.

५) ''माहेर'' या योजने अंतर्गत मुलगी जन्मताच तिच्या नावावर आवश्यक ती रक्कम फिक्स्ड डिपॉसिटमध्ये ठेवण्यात येईल व ती सज्ञान (Major) होताच उच्च शिक्षण व लग्नासाठी तिला रु.१२५०००/- (सव्वा लाख) एवढी रक्कम मिळवून देण्यात येईल.

# महिला व बालकल्याण विभाग - कुपोषण विरहीत महाराष्ट्र

ज्या समाजामध्ये पुरुषांच्या बरोबरीने महिलांचा मानसन्मान होतो व त्यांची प्रतिष्ठा वर्धित होण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होतात, अशा समाजाचे स्वास्थ्य सुदृढ व निकोप असते. विविध योजनांद्वारे बालकांची राज्य शासनातर्फे काळजी घेतली जाते.बालकांच्या जन्मापासून त्यांच्या आरोग्याची काळजी घेणा-या योजनांबरोबरच किशोरवयीन मुलींचे आरोग्य तद्वतच गरोदर व स्तनदा माता यांच्या आरोग्यावरही भर देण्यात आला आहे.

**पुढील पाच वर्षात महाराष्ट्र ''कुपोषण मुक्त'' करण्यात येईल.**

१) कुपोषण कमी करण्यासाठी संयुक्त जबाबदारीची गरज आहे. वैद्यकीय अधिका-यांकडून तीव्र कुपोषणाच्या प्रकरणांमध्ये तर आयसीडीएसकडून मध्यम स्वरुपाच्या कुपोषणामध्ये उपचार करण्याबाबत दक्षता घेण्यात येईल.

२) अंगणवाडी सेविकांना मदत व्हावी म्हणून आशा (ASHA – Accredited Social Health Activist) च्या कर्मचा-यांना प्रत्यक्ष घरांना भेटी देणे आणि माता व कुटुंबियांना आहार व आरोग्य विषयक माहिती देणेबाबत विशेष काळजी घेण्याच्या सूचना दिल्या जातील.

३) किशोरींसाठी पूरक पोषक आहार योजना लागू करण्यात येईल.

४) कुपोषित बालकांचा जन्म होऊ नये म्हणून गर्भवती मातांच्या आहाराची व आरोग्याची काळजी घेण्यात येईल.

५) प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ''सावित्रीबाई फुले महिला सांस्कृतिक भवन'' बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

**नवजात शिशु काळजी**

प्रसुतीनंतर नवजात शिशुच्या काळजीसाठी वैद्यकीय कर्मचारी व अंगणवाडी सेविका यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात येईल. वैद्यकीय अधिका-यास वैयक्तिकरित्या सर्व प्रसुतीच्या प्रकरणावर देखरेख ठेवण्यास सांगण्यात येईल.

**६ वर्षाखालील मुलांसाठी**

**१. जागतिक आरोग्य संघटनेची नवीन वजनाची/उंची परिमाणे स्वीकारणे:**

कमी वजनाची रोगट मुलांची निश्चित माहिती मिळविण्यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने ठरविलेल्या वाढ निकषाची कालबध्द अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी आयसीडीएस/आरोग्य संस्थांना नवीन वाढ तक्त्याचे प्रशिक्षण देण्यात येईल.

**२. गंभीर कुपोषणावर मात करणे :**

जागतिक आरोग्य संघटनेच्या वाढीच्या निकषाप्रमाणे जी मुले कुपोषित आहेत किंवा कमी पोषणाची लक्षणे दाखवितात, त्यांना त्यांच्या मातांसह जवळच्या योग्य रुग्णालयांमधील बालकांसाठी असलेल्या विकास केंद्रामध्ये (सीडीसी) १५ ते २१ दिवसांच्या कार्यक्रमासाठी दाखल करण्यात येईल. पूरक आहार देण्याच्या दृष्टीने मातांना प्रशिक्षित करुन सकस आहार देण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येईल.

**३.** मुलींची भ्रूणहत्या थांबविण्याची मोहीम (Save the Girl Child) प्रभावीपणे राबविण्यात येईल.

## सामाजिक न्याय विभाग

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे व समाजाच्या दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी पक्ष व पक्षाचे सरकार गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्नशील आहे. मुलांचा शैक्षणिक विकास, दुर्बल घटकांतील शेतक-यांना शासनाची होणारी मदत, सामाजिक सुरक्षेचा प्रभावी प्रयत्न, जातीविहीन समाज निर्मितीसाठी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन या व अशा अनेक योजना प्रस्तावित आहे.

त्याबरोबरच परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी चैत्यभूमी परिसरात जमिन उपलब्ध करून देण्यात येईल व स्मारकाचे काम कालबध्द आणि जलदगतीने होण्यासाठी ''चैत्यभूमी विकास प्राधिकरण '' स्थापन करण्यात येईल.

१. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राज्यसेवा, नागरीसेवा परीक्षा (Civil Services Exam) व तत्सम स्पर्धा परिक्षांकरिता आर्थिक मदत उपलब्ध करुन देण्यात येईल.

२. उसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मूळनिवासी जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थांच्या निवासी शाळांना अनुदान देण्यात येईल.

३. अ) संजय गांधी निराधार / आर्थिक दुर्बलांसाठी अनुदान योजना, इंदिरा गांधी निराधार व भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा योजना व अशा अन्य अनुदानित योजनांची आर्थिक मदतीची व्याप्ती दरमहा रुपये ६००/- पर्यंत वाढविण्यात येईल.

ब) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील विधवा स्त्रियांना उवर्रित आयुष्यासाठी ठराविक दराने निर्वाह भत्ता देण्यात येईल.

४. ५० टक्केपेक्षा जास्त अनुसूचित जातीच्या महिला असलेल्या बचतगटास उद्योगासाठी प्रोत्साहनपर बिनव्याजी कर्ज रक्कम देण्यात येईल.

५. दलित वस्ती सुधारण्यासाठी दिल्या जाणा-या निधीची मर्यादा रु.१० लाखापर्यंत वाढविण्यात येईल.

६. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मुलींना अनुक्रमे आंतरजातीय विवाह व कन्यादान योजनेअंतर्गत विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदानात वाढ करण्यात येऊन ते रुपये २०००० इतके करण्यात येईल.

७. ''माहेर'' या योजने अंतर्गत मुलगी जन्मताच तिच्या नावावर योग्य अशी रक्कम फिक्स्ड डिपॉसिटमध्ये ठेवण्यात येईल व ती सज्ञान (Major) होताच उच्च शिक्षण व लग्नासाठी तिला रु.१२५०००/- (सव्वा लाख) एवढी रक्कम मिळवून देण्यात येईल.

## आदिवासी विकास विभाग

राज्यात आदिवासींची लोकसंख्या ९ टक्के आहे. अतिदुर्गम, डोंगराळ भागात वस्ती करुन राहणा-या आदिवासी बांधवांना मदत करुन त्यांना समाजाच्या प्रमुख प्रवाहात आणावयाचे आहे. आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण व आरोग्य या दोन बाबींवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. विभागाच्या शासकीय व अनुदानित निवासी आश्रमशाळांमध्ये साधारणपणे साडेचार लाख मुले आज शिक्षण घेत आहेत. या संख्येत वाढ व्हावी तसेच राज्यातील आदिवासींचा सर्वांगिण विकास व्हावा अशा योजना राबविण्याचा आघाडी शासनाचा दृढ संकल्प आहे.

१. सर्व आश्रमशाळा कनिष्ठ महाविद्यालयात रुपांतरित करण्यात येतील.

२. आदिवासी मुलांना देण्यात येणा-या विद्यावेतनात दुप्पट वाढ करण्यात येईल.

३. भविष्यात डोंगराळ व अतिदुर्गम भागातील मुलींसाठी आश्रमशाळा महसूल मंडळ / तालुक्याच्या मुख्यालयी उघडण्यात येतील.

४. आदिवासी मुलांसाठी राज्य क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यात येईल.

५. आदिवासी भागात अंगणवाडीला जोडून पाळणाघराची व्यवस्था करण्यात येईल.

## अल्पसंख्यांकांना समान संधी

अल्पसंख्यांकांना समान दर्जा देण्यासाठी त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आम्ही कटिबध्द् आहोत. त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाची लोकशाही आघाडी शासन बांधिलकी स्विकारते.

- अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्टया कमकुवत विद्यार्थी आणि शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी, शिक्षणाच्या माध्यमातून नवे तांत्रिक कौशल्य या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील.

- मदरसाचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्यधारेत आणण्यासाठी दूरशिक्षण (Distance Education)पध्दतीच्या शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण करण्यात येईल.

- अभ्यासक्रमातील नव्या पॅकेजमुळे मदरसा विद्यार्थ्यांचे भविष्य बदलेल. मदरसा मंडळाला आवश्यक ते मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य दिले जाईल.
- सध्याच्या मदरसा शिक्षण देणा-या शिक्षकांचे प्रशिक्षण हे एक आव्हान आहे म्हणून या शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी मध्यवर्ती संस्था निर्माण करण्यात येईल.
- महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्यांक मुलामुलींसाठी वसतिगृहे उघडली जातील.
- सच्चर समितीच्या राज्य शासनाशी संबंधित शिफारशींची अंमलबजावणी करण्यात येईल.

**समान न्यायाची खात्री होण्यासाठी दरी बुजविणे**

लोकशाही आघाडी शासन अल्पसंख्यांक समूह आणि समाजातील कमकुवत घटकांमध्ये एकात्मिक बालविकास योजनांचा विस्तार करील.

अल्पसंख्यांक समूहातील मुले आणि मुलींना एमबीबीएस, बीटेक, एमबीए, एमसीए, बीएड, बॅचलर ऑफ लायब्ररी सायन्स इत्यादि सारख्या व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी वित्तीय सहाय्यता दिली जाईल.

## प्रादेशिक असमतोल

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचा व भौतिक सुविधांचा अनुशेष दूर करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात येईल. रस्ते, जलसिंचन, शिक्षण, आरोग्य अशा भौतिक पायाभूत सुविधांचा अनुशेष काढून टाकणे हा प्रादेशिक असमतोल दूर करण्यामधील महत्वाचा भाग आहे. तरी देखील विकासाचे उद्दिष्ट केवळ भौतिक संसाधनांची निर्मिती एवढ्यापुरतेच मर्यादित नसून मानवी विकासाचे निर्देशांक वाढविणे हा आहे. भौतिक सुविधांचा अनुशेष दूर करण्याबरोबरच शिक्षण (साक्षरता, शाळा, शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, शिक्षणाचा दर्जा), आरोग्य (दीर्घायुष्य, बालमृत्यू, बाळंतपणातील मृत्यू, प्रतिबंधात्मक रोग), आणि लिंगभेद इत्यादी मानवी विकासातील अनुशेष निर्मूलन कार्यक्रमही हाती घेण्यात येतील.

महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील मानवी विकास निर्देशांकात समानता आणण्यासाठी आर्थिक व वित्तीय नसलेल्या सर्व घटकांचा समावेश असलेला कार्यक्रम तयार करण्यात येईल.

## विधी व न्याय विभाग

अनेक कायदे ब्रिटीश काळापासून चालत आलेले आहेत. महसूल व वन विभागातील कायद्यांमध्ये मूलभूत मुद्यांवर सुधारणा करण्याची गरज आहे. शासनाने याकरिता महाराष्ट्र विधी आयोगाची निर्मिती केली होती व त्या समितीने अनेक कायद्यांमध्ये सुधारणा सुचविलेल्या आहेत. काही कायद्यांतील सुधारणांचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतील.

राज्य शासनाशी संबंधित असलेल्या कायद्यांचे प्रस्ताव मात्र राज्य शासन त्वरित अंतिम करुन योग्य ती पावले उचलून सुधारणा केल्या जातील.

## वक्फ

**सामाजिक अभिसरण** (Social Engineering), **समाजाचा विकास आणि धर्मादाय प्रकल्प**

वक्फ ही मुस्लिम जीवन पध्दतीची एक वैशिष्टयपूर्ण ओळख आहे. वक्फमधील मालमत्तेचा उपयोग हा नेहमीच धर्मादाय कामासाठी केला जातो. महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणावर वक्फ मालमत्ता असून कालबध्द कार्यक्रम आखून त्याचे सर्वेक्षण केले जाईल.

गरीबांचे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन सुधारणा-या या विस्तृत आणि व्यापक साधनांचा काही समाजविघातक व्यक्ती दुरुपयोग करीत आहे. आमचा पक्ष वक्फ मालमत्तेचे पावित्र्य ओळखतो. वक्फ मालमत्तेवरील अतिक्रमणे काढावी आणि समाजविघातक घटकांकडून त्याचे संरक्षण व्हावे आणि सार्वजनिक जागा निष्कासित कायदा (Public Premises Eviction Act ) वक्फ मालमत्तांना लागू केला आहे. याशिवाय या वक्फ मालमत्तेपासून उत्पन्न मिळावे म्हणून महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याअंतर्गत बाकी राहिलेल्या भाडयाची वसुली करण्याची तदतूद करण्यात येईल. भू-माफियांच्या कचाट्यातून वक्फ मालमत्ता मोकळी करण्याचा निर्धार आम्ही करीत आहोत.

वक्फच्या पैशातून खालील प्रकल्पांना अर्थसहाय्य केले जाईल.

- उच्च दर्जाचे शिक्षण देणा-या शिक्षण संस्था उभारणे.
- मशिदी, दर्गे व कबरस्थान यांची दुरुस्ती व देखभाल करणे.
- रुग्णालये / आरोग्य सेवा केंद्रे, सामुदायिक कल्याण कार्यक्रम राबविणे.
- अनाथ / मुली / दारिद्रयरेषेखालील कुटुंबे यांना अर्थसहाय्य देणे.
- महिलांच्या स्वयंसहाय्यक /बचतगटांना मदत करणे.

## महाराष्ट्राचा गौरवशाली सांस्कृतिक वारसा

महाराष्ट्राला अत्यंत गौरवशाली व भक्कम सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. सर्व जाति धर्माच्या लोकांना एकत्र आणणे, त्यांच्यात एकोपा निर्माण करणे, समाजामध्ये सर्व धर्म समभावाची भावना रुजवणे आणि जात, पंथ, धर्म यावर विश्वास न ठेवता सर्व जाति-धर्माच्या लोकांमध्ये सामाजिक ऐक्य निर्माण करणे ही या सांस्कृतिक वारशाची वैशिष्ट्ये आहेत.

महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधिले जाते. महाराष्ट्राला मोठी संत परंपरा लाभलेली आहे. या संतांचे उपदेश व शिकवणूक ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ठेव्याचा अविभाज्य भाग आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत गोरा कुंभार, संत नामदेव,संत सावता माळी, संत सेना न्हावी, संत जनाबाई ,मुक्ताबाई अशा काही संतांची नावे प्रातिनिधिक स्वरुपामध्ये

घेता येतील. आपल्या असेही लक्षात येईल की, या संतांच्या शिकवणुकीमुळे समाजातील ऐक्य आजवर अबाधित राहीले आहे. एवढेच नव्हे तर निधर्मी पायावर उभ्या राहिलेल्या महाराष्ट्र समाजामध्ये यामुळेच ऐक्य व सुसंवाद आजतागायत कायम राहीला आहे व यापुढेही कायम राहील.

राजर्षि शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महर्षि विठ्ठल रामजी शिंदे व प्रा. गोपाळ गणेश आगरकर यासारख्या सुधारणावादी व पुरोगामी विचारांच्या समाजधुरिंणांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ठेव्यास योग्य आकार व दिशा दिली. यामुळे एकमेकांच्या बद्दल वाटणारा आदर, मानवी मूल्यांची शिकवण आणि समाजाचे निकोप आरोग्य याचा एक वैशिष्ट्यपूर्ण नमुना वरील सर्व महान समाज सुधारकांच्या व संतांच्या शिकवणुकीमुळे कायमचा निर्माण झाला.

छत्रपती शिवाजी महाराज हे तर तमाम महाराष्ट्रीय जनतेचे आराध्य दैवत होत. शूर योध्दा व रयतेच्या या जाणत्या राजाची पूजा महाराष्ट्रातला प्रत्येक नागरिक करतो. स्त्रियांचा व सर्व जातीधर्मातील लोकांचा आदर करायला त्यांच्या आदर्श व निर्दोष राज्य कार्यपध्दतीने शिकविले. गरजेनुरुप राज्य कार्यपध्दतीत त्यांनी वेळोवेळी आवश्यक त्या सुधारणा केल्या. म्हणूनच आपल्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्श शासन कार्यपध्दतीचा वारसा लाभलेला आहे.

लोकशाही आघाडी असा प्रण करते की, उपरोल्लेखित संतांचा, समाजाला नेतृत्व देणाऱ्या समाज सुधारकांचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान कधीही सहन केला जाणार नाही व अभावाने कोणी अशी हिम्मत केलीच तर त्याच्या विरुध्द निश्चयी व कडक कारवाई केली जाईल.

विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ठेव्याची ओळख व्हावी तसेच महाराष्ट्रातील संतांची शिकवण व समाजसुधारक नेत्यांचे पुरोगामी व सुधारणावादी विचारांचे संस्कार शालेय जीवनातच मुलांवर व्हावेत म्हणून शालेय अभ्यासक्रमात संतांची शिकवण व समाजसुधारकांच्या पुरोगामी विचारांचा अंतर्भाव केला जाईल.

## मराठी–महाराष्ट्राचे भूषण

मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, ती सशक्त व समृध्द करण्यासाठी तद्वतच तीची चौफेर प्रगती होण्यासाठी राज्य शासन आवश्यक ती सर्व पाऊले उचलेल व तिच्या संरक्षण व संवर्धनासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करेल. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये व देशाच्या सुसंस्कारित भावी नागरिकांची पिढी निर्माण करण्यामध्ये मराठी भाषेचा सिंहाचा वाटा आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसच्या आघाडी तर्फे मुद्दाम स्पष्ट करण्यात येते की, राज्यभाषा आणि मायबोली मराठीच्या बरोबर आम्ही अनुसूचित व बिगर अनुसूचित अशा सर्व भाषांच्या प्रति आदर बाळगतो व सन्मान करतो.

## २१ व्या शतकाच्या महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील
## विधान सभा निवडणूक २००९ साठी
## भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व रिपाई इत्यादी मित्र पक्षांचा

# संयुक्त जाहीरनामा

## २१ कलमी कार्यक्रम

१) राज्याचे दरडोई (सरासरी) वार्षिक उत्पन्न रु. १ लाखापर्यंत वाढवण्यासाठी आवश्यक ती पाऊले उचलण्यात येतील.

२) राज्यातील सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन अधिक सुरक्षित करण्यासाठी तसेच राज्यातील कायदा व सुव्यवस्था चांगली रहावी यासाठी हाती घेतलेल्या कार्यक्रमांना अधिक गती देण्यात येईल. तसेच नक्षलवाद व दहशतवाद यांचा बिमोड करण्यासाठी पोलीस दल अधिक सक्षम करण्यात येईल व त्यासाठी ठोस पाऊले उचलण्यात येतील.

३) महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेखालील (BPL) नागरिकांना गहू, तांदूळ, ज्वारी इत्यादी २५ किलोग्रॅम अन्नधान्य रु.३/- प्रती किलोग्रॅम या दराने देण्यात येईल.

४) महाराष्ट्र राज्य वीज पुरवठ्याच्या बाबतीत २०१२ पर्यंत भारनियमन मुक्त (लोडशेडींगमुक्त) करण्याच्या दिशेने घेतलेल्या ठोस कार्यक्रमांना अधिक गती देण्यात येईल.

५) राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी पुढील ५ वर्षात १० लाख परवडणारी घरे बांधण्याचा कालबध्द कार्यक्रम राबविण्यात येईल.

६) अ) शेतीसाठी सहकारी बँकांमार्फत ३ लाखांपर्यंतचे कर्ज ३% व्याज दराने देण्यात येईल. ही योजना नियमितपणे कर्जफेड करणा-या शेतक-यांना लागू राहील.

ब) शेतकऱ्यांना त्यांच्या मालासाठी रास्त भाव मिळावा त्याचप्रमाणे ग्राहकांना देखील भाव वाढीला तोंड द्यावे लागू नये म्हणून शेतकरी ते ग्राहक अशी कायमस्वरुपी थेट पणन व्यवस्था निर्माण करण्यात येईल.

क) पतसंस्थांमधील ठेवीदारांच्या ठेवी संरक्षित करण्यासाठी व वेळेवर परत करण्यासाठी पतसंस्था नियामक मंडळ स्थापन करण्यात येईल.

७) "सुजल महाराष्ट्र निर्मल महाराष्ट्र" या अभियाना अंतर्गत ग्रामिण व शहरी भागात सर्वांना वैयक्तिक नळजोडण्या देण्यात येतील. तसेच सर्वांसाठी स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन देण्यात येईल.

८) अ) मुंबई-नाशिक एक्सप्रेस वे पुढील पाच वर्षात पूर्ण करण्यात येईल. तसेच पुणे-मुंबई एक्सप्रेस वे सायन पर्यंत विस्तारित करण्यात येईल.

ब ) राज्यातील प्रमुख शहरे किमान ४ पदरी रस्त्यांनी जोडण्यात येतील.

क) वाड्या, तांडे, पाडे, बेडे यासह ५०० लोकवस्ती पर्यंतच्या व त्यावरील सर्व गावांना डांबरी रस्त्याने जोडण्यात येईल.

९) परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी चैत्यभूमी परिसरात जमीन उपलब्ध करुन देण्यात येईल व स्मारकाचे काम कालबध्द व जलद गतीने होण्यासाठी "चैत्यभूमी विकास प्राधिकरण" स्थापन करण्यात येईल.

१०) अ) वाढत्या शहरीकरणाच्या गरजा भागविण्यासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करणारे धोरण राबविण्यात येईल.

ब) मुंबई शहर आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून विकसित करण्यात येईल व " व्हिजन मुंबई " ची कामे कालबध्द पध्दतीने हाती घेऊन पुढील ५ वर्षांत पूर्ण करण्यात येतील.

११) अ) सर्व स्तरांवरील पंचायत संस्थांमध्ये महिलांना ५०% आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात येईल.

ब) "माहेर" या योजने अंतर्गत मुलगी जन्मताच तिच्या नावावर योग्य अशी रक्कम फिक्स्ड डिपॉसिटमध्ये ठेवण्यात येईल व ती सज्ञान (Major) होताच उच्च शिक्षण व लग्नासाठी तिला रु.१२५०००/- (सव्वा लाख) एवढी रक्कम मिळवून देण्यात येईल.

क) अनुसूचित जाती - जमातीच्या महिला बचत गटांना उद्योगासाठी बिनव्याजी कर्ज देण्यात येईल.

१२) अ) पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी पुढील ५ वर्षात ठोस कार्यक्रम हाती घेण्यात येतील.

ब) जागतिक तापमान वाढीचे मोठे आव्हान लक्षात घेता वृक्ष लागवडीचा राज्यव्यापी कार्यक्रम हाती घेऊन "ग्रीन महाराष्ट्र" ही संकल्पना साकार करण्यात येईल.

१३) अ) नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन सिंचन क्षेत्रात वाढ करण्यात येईल व अपूर्ण योजना कालव्यांसह पूर्ण करण्यात येतील.

ब) राज्यातील मोठे, मध्यम व लघुसिंचन प्रकल्प तसेच पाझर तलाव इत्यादी मध्ये साचलेला गाळ काढण्याची योजना हाती घेण्यात येवून हा गाळ शेतात टाकण्यासाठी शेतक-यांना मदत करण्यात येईल.

१४) अ) राज्यातील कापूस उत्पादक परिसरात (भागात) कापसावरील प्रक्रिया करणारी केंद्रे उभी करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पाऊले उचलण्यात येतील.

ब) राज्याची औद्योगिक प्रक्रिया अधिक वेगवान करण्याकरिता एक खिडकी योजना राबविण्यात येईल व जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतील.

क) मध्यम व लघुउद्योगांसाठी स्वतंत्र विभाग सुरु करण्यात येईल व अशा उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येईल.

ड) संघटीत व असंघटीत क्षेत्रातील सर्व कामगारांना कामगार कायद्याचे सर्व फायदे मिळवून देण्यासाठी 'स्मार्ट कार्ड' देण्यात येईल.

ई) शेतमजुरांमध्ये विविध प्रकारची व्यवसायिक कौशल्ये निर्माण करुन त्यांचे बचत गट स्थापन करण्यात येतील व अशा बचत गटांना व्यवसायासाठी ४ टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

इ) विविध प्रकारच्या कारागिरांचे बचत गट स्थापन करण्यात येतील व या बचत गटांना उद्योगासाठी ४ टक्के व्याजाने बँकेचे कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

१५) अ) महाराष्ट्र राज्याचा मानवी विकास निर्देशांक (Human Development Index) वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

ब) राज्यातील प्रत्येक महसुल विभागातील किमान एका शासकीय रुग्णालयाचा दर्जा उन्नत (upgrade) करुन त्याठिकाणी उपचाराच्या सर्व आधुनिक सोयी उपलब्ध करण्यात येतील.

१६) अ) मुलींना पदवी पर्यंतचे आणि मुलांना १२ वी पर्यंतचे सर्व प्रकारचे शिक्षण मोफत देण्यात येईल.

ब) ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्यात येईल तसेच शिक्षणाची गुणवत्ता सुधारली जाईल.

क) युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी तसेच त्यांच्यातील क्रीडा गुणांचा विकास होण्यासाठी विविध योजना आखून त्यांची कालबध्द पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येईल.

१७) अ) राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व मागासवर्गीयांच्या उत्थानाचा कालबध्द कार्यक्रम राबविण्यात येईल.

ब) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अन्य सर्व मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांना राज्याच्या विकास प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यासाठी पायाभूत सुविधा, आरोग्य व शिक्षणाचा विशेष कार्यक्रम राबविण्यात येईल.

क) अल्पसंख्यांकांच्या विकासाच्या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात येईल आणि त्यांच्या शिक्षण आणि आरोग्यासाठी ५ वर्षांचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

ड) क्रांतिवीर लहूजी साळवे आयोगाने दिलेल्या अहवालावरील नेमलेल्या तज्ज्ञ समितीच्या शिफारशींप्रमाणे अंमलबजावणीचा पुढील कृती कार्यक्रम ठरविण्यात येईल.

ई) राज्यातील शारीरिकदृष्ट्या कमकुवत असणा-यांसाठी (अपंगांसाठी) कल्याणकारी योजना राबविण्यात येवून व त्यांच्यासाठी सर्व स्तरांवरील आरोग्य व शिक्षणाची सोय मोफत करण्यात येईल.

इ) इतर मागासवर्गीयांच्या (O.B.C.) उन्नतीसाठी विकासाचे विशेष कार्यक्रम राबविण्यात येतील.

उ) उत्पन्नाचे कोणतेही साधन नसलेल्या ६५ वर्षे वयावरील स्त्री किंवा पुरुषांना आजीवन दरमहा रु.६००/- प्रमाणे निवृत्ती वेतन (पेन्शन) देण्यात येईल. यामुळे ज्येष्ठ नागरिक, बचत गटांच्या महिला यांना वृध्दापकाळात मोठा आधार मिळेल.

१८) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील नागरिकांना आरोग्य पत्र (Health Card) देण्यात येईल व अशा आरोग्यपत्र धारक नागरिकांना, हृदयरोग, कर्करोग, किडनी विकार, ब्रेनट्यूमर इत्यादी दुर्धर आजारांवरील उपचार व सर्व शस्त्रक्रिया विनामूल्य करण्याची तरतूद करण्यात येईल.

१९) अ) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राच्या विकासाचा व भौतिक सुविधांचा अनुशेष दूर करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखण्यात येईल.

ब) आत्महत्याग्रस्त भागातील शेतक-यांच्या सर्वंकष उन्नती व विकासाच्या योजना कालबध्द रितीने व प्रभावीपणे राबविण्यात येतील.

२०) लोकाभिमुख, संवेदनशील, पारदर्शी व जबाबदार सुशासनाच्या अनेक उपायोजना करण्यात येतील.

२१) अ) मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन व भरभराट होण्यासाठी खालील उपक्रम राबविले जातील.

- प्रतिवर्षी १ मे ते १५ मे दरम्यान "मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा" साजरा करण्यात येईल.
- प्रशासनात मराठीच्या उपयोगाची तपासणी व उपाययोजना सुचविण्यासाठी विधी मंडळ समिती (Legislative Committee) नियुक्त करण्यात येईल.

ब) महाराष्ट्राचा सांस्कृतिक ठेवा जपण्याकरिता व त्याचे संवर्धन करण्यासाठी खालील उपक्रम राबविले जातील.

- राज्य शासनाने घोषित केलेल्या गढ, किल्ले इत्यादी पुरातत्वीय स्मारकांची (Archealogical Monuments) पर्यटन वाढीसाठी दुरुस्ती व सुधारणा करण्यात येईल.
- पंढरपूर या तीर्थक्षेत्री प्रत्येक जिल्ह्याच्या वारकरी भवनासाठी मूलभूत सुविधांसह जागा उपलब्ध करुन देण्यात येईल.

# महाराष्ट्राचा एकच निर्धार
# पुन्हा आघाडीचे सरकार

# आपले मत आघाडीला
# महाराष्ट्राच्या विकासाला

मतदान मंगळवार दिनांक १३ ऑक्टोबर २००९ सकाळी ७.०० ते ५.००

प्रकाशक : सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी व सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रती : ५००